आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
८ ऑगस्ट २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेत वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक सादर/अल्पसंख्यकांना न्याय मिळणार असल्याचा सरकारचा दावा, तर विरोधी पक्षांचा विधेयकाला विरोध

- भारतीय रिझर्व बँकेचं चालू आर्थिक वर्षातलं तिसरं द्वैमासिक पतधोरण जाहीर, सलग नवव्यांदा रेपो दर कायम

- बांगलादेशातल्या राजकीय अस्थिरतेमुळं कांदा निर्यात तात्पुरती बंद ठेवण्याचा राज्यातल्या व्यापाऱ्याचा निर्णय

- पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांचं निधन

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भालाफेकपटू नीरज चोप्रा पदकासाठी मैदानात/महिला कुस्तीपटू विनेश फोगाट हिची निवृत्तीची घोषणा

**<><><><><>**

लोकसभेत आज वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४ अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी सादर केलं. यात वक्फ कायदा १९९५ मध्ये सुधारणा करुन राज्य वक्फ बोर्डांचे अधिकार आणि कार्यप्रणाली तसंच वक्फ मालमत्तेची नोंदणी आणि सर्वेक्षणाशी संबंधित समस्यांचं निराकरण करण्याचा प्रयत्न असल्याचं रिजिजू यांनी सांगितलं. अल्पसंख्याकांना न्याय

देण्यासाठी हा कायदा आणण्यात आल्याचं सरकारनं म्हटलं आहे. काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानं या विधेयकाला विरोध केला असून सर्वपक्षीय बैठक बोलावून सूचना घेण्याची मागणी केली आहे.

सरकारनं जल जीवन मिशन अंतर्गत देशभरातील ७७ टक्क्यांहून अधिक ग्रामीण कुटुंबांना नळ जोडणी दिली आहे असं लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पूरक प्रश्नांना उत्तर देताना केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी सांगितलं. या योजने अतंर्गत आतापर्यंत १५ कोटी कुटुंबांना नळ जोडणी देिल्याचं त्यांनी म्हटलं आहे. कांदा आणि बटाट्याच्या दर वाढीवरून विरोधी पक्षांच्या खासदारांनी आज संसद परिसरात निदर्शनं केली. शेतमालाला हमीभाव देण्यासाठी कायदेशीर तरतुदीची मागणी खासदारांनी केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओब्रायन, राष्ट्रीय जनता दलाचे खासदार मनोज कुमार झा, काँग्रेसचे खासदार प्रमोद तिवारी आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व बँकेनं आज चालू आर्थिक वर्षातलं तिसरं द्वैमासिक पतधोरण जाहीर करताना सलग नवव्यांदा रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीनं रेपो दर ६ पूर्णांक ५ दशांश टक्क्यावर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला असून

त्यामुळे स्थायी  ठेवींवरचा व्याज दर ६ पूर्णांक २५ शतांश टक्के राहील, तसंच मुदत ठेवींवरचा व्याज दर आणि बँकांचा व्याज दर ६ पूर्णांक ७५ शतांश टक्क्यावर कायम राहील, असं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितलं. आर्थिक विकासाला चालना देताना चलनवाढ निर्धारित उद्दिष्टाशी  सुसंगत राहील, यावर लक्ष केंद्रित करण्यावर पतधोरण समितीनं भर दिल्याचं ते म्हणाले.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची ६, ७ आणि ८ ऑगस्ट रोजी बैठक झाली. पुढील बैठक ७ ते ९ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे.

**<><><><><>**

भारताची आर्थिक प्रगती वेगानं होत असून भारत लवकरच जागतिक उत्पादन केंद्र बनेल असं जागतिक व्यापार संस्था लझार्डच्या अहवालात म्हटलं आहे. भारतातल्या  एकूण लोकसंख्येपैकी ८० टक्के  कामगार ५० वयोगटाच्या आतले असून युवावर्गाचा  फायदा यासाठी होणार आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी त्यांच्या दहा वर्षाच्या कारकिर्दीत भारताची मॅक्रोइकॉनॉमी स्थिर केली असून डिजीटल इकॉनॉमीसह, कर आणि इतर सुधारणा लागू केल्यामुळं भारताची आर्थिक प्रगती मजबूत होत चालली आहे.

**<><><><><>**

रक्षाबंधनाच्या निमित्तानं माझी लाडकी बहीण योजना सुरू झाली असून १७ ऑगस्ट रोजी जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे ३ हजार रुपये मिळणार आहेत. नियमात बसणाऱ्या महिलांच्या खात्यात हे पैसे जमा होतील, अशी घोषणा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिंडोरी इथं केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसन्मान यात्रेला आजपासून सुरुवात होत आहे. त्या निमित्तानं आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.

या वर्षीच्या अर्थसंकल्पात महिलांसाठी, तरुणांसाठी, शेतकऱ्यांसाठी अनेक चांगल्या योजना महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून आणल्या. त्यापूर्वी मी जनतेच्या गरजा समजून घेतल्या, अर्थमंत्री म्हणून जे करणं शक्य आहे, ते करण्याचा प्रयत्न केला, असं अजित पवार यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्था यंदाचा स्वातंत्र्य दिवस पृथ्वी निरीक्षक उपग्रह प्रक्षेपित करून साजरा करणार आहे. १५ ऑगस्ट रोजी श्रीहरीकोटा इथून सकाळी ९ वाजून १७ मिनिटांनी इस्रोनं विकसित केलेला लघु उपग्रह प्रक्षेपकाच्या सहाय्यानं EoS 08 हा पृथ्वी निरीक्षक उपग्रह अवकाशात सोडला जाईल. त्यानंतर तो पृथ्वीच्या कक्षेत स्थिरावेल. हा उपग्रह आपत्ती निरीक्षण, रिमोट सेन्सिंग, आग आणि पूर शोध आणि अतिनील किरण मापनासाठी उपयुक्त असलेल्या प्रगत तंत्रज्ञानानं सुसज्ज आहे.

**<><><><><>**

केंद्रसरकारनं काल राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार जाहीर केले. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रांमध्ये अतुलनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या प्रतिष्ठेच्या पुरस्कारानं सन्मानित केलं जातं. यंदा इस्रो-चांद्रयान ३ च्या चमूला अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानामधल्या योगदानाबद्दल ‘विज्ञान टीम’ या पुरस्कारानं सन्मानित केलं जाईल. भारतीय विज्ञान संस्थेचे माजी संचालक प्राध्यापक जी. पद्मनाभन यांची जीवशास्त्रातल्या ‘विज्ञानरत्न’ पुरस्कारासाठी निवड झाली आहे. याशिवाय विज्ञानश्री आणि विज्ञान युवा पुरस्कारही घोषित झाले आहेत.

येत्या २३ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**<><><><><>**

बांगलादेशातल्या राजकीय अस्थिरतेमुळं महाराष्ट्रातल्या व्यापाऱ्यांनी कांदा निर्यात तात्पुरती बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. परिस्थिती स्थिर झाल्यानंतरच निर्यात पुन्हा सुरू होईल.

बांगलादेशात कांद्याचा सर्वात जास्त पुरवठा भारतातून होतो. महाराष्ट्रातल्या नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर आणि पुणे या जिल्ह्यांतून सर्वाधिक कांदा निर्यात होतो. सध्या राजकीय अस्थिरतेमुळे ७० ट्रक सीमेवर अडकले होते. त्यातल्या काहींना परवानगी मिळाल्यानं ते

बांगलादेशात पोहोचले आहेत. मात्र, परिस्थिती आटोक्यात आली नाही तर निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळं व्यापाऱ्यांनी सावध भूमिका घेत निर्यात बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

बांगलादेशात अडकलेले राज्यातले विद्यार्थी आणि अभियंत्यांना मदत करण्यासाठी आणि त्यांना मायदेशी परत आणण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याशी चर्चा केली. या विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन जयशंकर यांनी यावेळी दिलं. या विद्यार्थ्यांना परत आणण्याच्या कार्यवाहीसाठी परराष्ट्र मंत्रालयात सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

बांगलादेशात कापसाच्या वाढत्या मागणीमुळे भारताच्या कापूस निर्यातीत वाढ होणार असल्याचं सांगितलं जात आहे. बांगलादेशातल्या सूत गिरण्यांमध्ये कापसाची मागणी वाढत असल्यामुळे भारताची कापूस निर्यात दोन तृतीयांश टक्के वाढणार आहे. या वर्षी २६ लाख गाठी इतकी निर्यात होईल, असं कॉटन असोसिएशन ऑफ इंडियानं म्हटलं आहे. भारतातून बांगलादेशाला दर महिन्याला एक ते दीड लाख गाठी इतकी निर्यात केली जाते.

<><><><><>

पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते बुद्धदेव भट्टाचार्य यांचं आज कोलकत्यात निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. भट्टाचार्य यांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. भट्टाचार्य यांनी बांधिलकी जपत राज्याची सेवा केली असं प्रधानमंत्री म्हणाले.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बुद्धदेव भट्टाचार्य यांचं निधन आपल्यासाठी धक्कादायक आणि दुःखदायक असल्याचं पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. पश्चिम बंगालमध्ये आज सार्वजनिक सुट्टी आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे पश्चिम बंगालचे राज्य सचिव मोहम्मद सलिम यांनी भट्टाचार्य यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. बुद्धदेव भट्टाचार्य यांनी देहदान केल्यामुळे जनतेनं आदरांजली अर्पण केल्यानंतर त्यांचं पार्थिव रुग्णालयाला सुपूर्द करण्यात येईल असं सलिम यांनी सांगितलं.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिक मध्ये आजचा दिवस भारतासाठी अत्यंत महत्वाचा असणार आहे. भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्रा आज पुन्हा पदकासाठी मैदानात उतरणार आहे. तर पुरुष हॉकी संघाची कास्य पदकासाठी स्पेन बरोबर लढत होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार नीरज चोप्राचा सामना

रात्री ११ वाजून ५५ मिनिटांनी सुरू होईल. तर पुरुष हॉकी संघाचा सामना संध्याकाळी ५ वाजता होणार आहे. कुस्ती मध्ये अमन सहरावत पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात तर अंशु महिलांच्या ५७ किलो वजनी गटात, फ्री स्टाइल कुस्ती प्रकारात मैदानात उतरणार आहेत.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमधून अपात्र ठरल्यानंतर भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगाट हिनं आज आपल्या निवृत्तीची घोषणा केली. समाजमाध्यमावर पोस्ट करत आपण सर्व चाहत्यांच्या आणि देशवासियांच्या कायम ऋणात राहू असं विनेशनं म्हटलं आहे. दरम्यान, या निर्णयाविरोधात तिने क्रीडा लवाद न्यायालयात दाद मागितली असून आपल्याला रौप्य पदक द्यावं अशी मागणी केली आहे.

<><><><><>

रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या मराठवाडा उपकेंद्राच्या उभारणीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं आहे. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. जालना इथल्या उपकेंद्राच्या पदनिर्मितीला मान्यता आणि मूल्यनिर्धारण अहवालानुसार संस्थेस देय असलेली वेतन अनुदानाची रक्कम देण्यासंदर्भातही सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असंही पाटील यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यामध्ये भिवंडी-वाडा मार्गावर सुरू असलेल्या मेफड्रोन उत्पादन युनिटवर गुजरात दहशतवादविरोधी पथकानं टाकलेल्या छाप्यात ८०० कोटी रूपये किंमतीचं ८०० किलो लिक्विड मेफड्रोन जप्त करण्यात आलं आहे. दहशतवादविरोधी पथकानं ५ ऑगस्ट रोजी झालेल्या या कारवाईतून दोन आरोपींना ताब्यात घेतलं.

**//<><><><><>//**